मुख्य लेखा व वित्त विभाग
पुणे महानगरपालिका
जा.क्र.:-R&TA/ 9033
दिनांक :- 24/6/2020

कार्यालयीन परिपत्रक

विषय :- सन २०१८-२०१९ व २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील वार्षिक वृत्तांत सादर करणेबाबत.

पुणे महानगरपालिकेतील विविध खात्यांकडून दरवर्षी वार्षिक वृत्तांत छपाईचे काम करावयाचे असल्याने आपले खात्याच्या वार्षिक वृत्तांताची माहिती त्वरित पाठविण्यात यावी. वार्षिक वृत्तांताची माहिती पुढे दिलेल्या निकषाप्रमाणे पाठविण्यात यावी.

सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० वार्षिक वृतांत

१) वार्षिक वृत्तांताची माहिती Hard Copy द्वारा फाइलमध्ये जोडून सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० च्या प्रत्येकी एकूण २ प्रतीमध्ये पाठविण्यात यावी.

२) वार्षिक वृत्तांताची संपूर्ण माहिती **rnt@punecorporation.org** या मेलवर पाठविण्यात यावी. Data Base मधील माहिती जतन करणेत यावी जेणेकरून भविष्यामध्ये कोणतीही कायदेशीर बाब अथवा प्रश्न उपस्थित झाल्यास आपणास माहितीचा Data Save असल्यामुळे आपणास माहिती केंव्हाही त्वरित उपलब्ध करून देण्यास अडचण निर्माण होणार नाही.

३) दोन्ही फाइलच्या पृष्ठभागावर स्केच पेनने ठळक मोठ्या अक्षरात आर्थिक वर्षाचा उल्लेख, वार्षिक वृतांत, खात्याचे नांव व खात्याचा विषय नोंदविण्यात यावा.

४) वार्षिक वृत्तांताची माहिती ८ दिवसाच्या आंत मुख्य लेखा व वित्त कार्यालयाकडील प्राप्ती व चाचणीचे अर्थान्विक्षक विभागाकडे पाठविण्यात यावी.

वार्षिक वृत्तांत पाठविताना जर आपणास काही समस्या, उणीवा किंवा अडचणी भासत असतील तर त्यासाठी उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी, श्री.कुणाल मंडवाले /कार्यालयीन सेवक यांचेशी समक्ष अथवा फोनवरून संपर्क साधावा.

सदरच्या छपाईबाबत विलंब झाल्यास याची संपूर्ण जबाबदारी आपले कार्यालयावर राहील याची नोंद घेण्यात यावी ही विनंती.

मा.स.कळावे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पुणे महानगरपालिका

प्रति,
मा.सर्व खातेप्रमुख,
पुणे महानगरपालिका